भारत सरकार

विधि व न्याय मंत्रालय

# मातापिता व ज्येष्ठ नागरिक यांचा निर्वाह व कल्याण अधिनियम, २००७

(सन २००७ चा अधिनियम क्रमांक ५६)

[ रोजी यथाविद्यमान ]

# The Maintenance and Welfare of Parents and Senior Citizens Act, 2007

(Act No. 56 of 2007)

[ As in force on the ]

संचालक, मुद्रण व लेखनसामग्री, महाराष्ट्र शासन यांनी भारत सरकारच्या वतीने मुद्रित व प्रकाशित केले.

२०१७

[ **किंमत** : रुपये ]

# मातापिता व ज्येष्ठ नागरिक यांचा निर्वाह व कल्याण अधिनियम, २००७

## कलमांचा क्रम

कलमे

प्रकरण एक

**प्रारंभिक**

१. संक्षिप्त नाव, व्याप्ती, प्रयुक्ति व प्रारंभ.

२. व्याख्या.

३. अधिनियमाचा अधिभावी प्रभाव असणे.

**प्रकरण दोन**

**मातापिता व ज्येष्ठ नागरिक यांचा निर्वाह**

४. मातापिता व ज्येष्ठ नागरिक यांचा निर्वाह.

५. निर्वाह खर्चासाठी अर्ज.

६. अधिकारिता आणि कार्यपद्धती.

७. निर्वाह न्यायाधिकरण घटित करणे.

८. चौकशीच्या बाबतीत संक्षिप्त कार्यपद्धती.

९. निर्वाह खर्चासाठी आदेश.

१०. भत्त्यात फेरफार.

११. निर्वाह खर्चासंबंधीच्या आदेशाची अंमलबजावणी.

१२. विवक्षित प्रकरणांमध्ये निर्वाह खर्चासंबंधीचा विकल्प.

१३. निर्वाह खर्चाची रक्कम जमा करणे.

१४. कोणतीही हक्क मागणी मंजूर करण्यात येईल त्याबाबतीत व्याज देण्याचाही आदेश देणे.

१५. अपील न्यायाधिकरण घटित करणे.

१६. अपिले.

१७. कायदेशीर प्रतिनिधित्वाचा हक्क.

१८. निर्वाह अधिकारी.

प्रकरण तीन

**वृद्धाश्रमांची स्थापना**

१९. वृद्धाश्रमांची स्थापना.

प्रकरण चार

**ज्येष्ठ नागरिकांसाठी वैद्यकीय सेवेची तरतूद**

२०. ज्येष्ठ नागरिकांना वैद्यकीय साहाय्य.

प्रकरण पाच

**ज्येष्ठ नागरिकांचे जीवित व मालमत्ता यांचे संरक्षण**

२१. ज्येष्ठ नागरिकांच्या कल्याणासाठी प्रसिद्धी, जाणीव, इत्यादी संबंधीच्या उपाययोजना.

२२. या अधिनियमाच्या तरतुदींची अंमलबजावणी करण्यासाठी विनिर्दिष्ट करता येतील असे प्राधिकारी.

२३. मालमत्तेचे हस्तांतरण विवक्षित परिस्थितीत शून्यवत ठरणे.

प्रकरण सहा

**अपराध आणि न्यायचौकशीची कार्यपद्धती**

२४. ज्येष्ठ नागरिकास उघड्यावर टाकणे व त्याचा परित्याग करणे.

२५. अपराधांची दखल.

प्रकरण सात

**संकीर्ण**

२६. अधिकारी लोकसेवक असणे.

२७. दिवाणी न्यायालयांच्या अधिकारितेस रोध.

२८. सद्‌भावपूर्वक केलेल्या कृतीस संरक्षण.

२९. अडचणी दूर करण्याचा अधिकार.

३०. निदेश देण्याचा केंद्र सरकारचा अधिकार.

३१. आढावा घेण्याचा केंद्र सरकारचा अधिकार.

३२. नियम करण्याचा राज्य शासनाचा अधिकार.

# मातापिता व ज्येष्ठ नागरिक यांचा निर्वाह व कल्याण अधिनियम, २००७

(२००७ चा अधिनियम क्रमांक ५६)

[ रोजी यथाविद्यमान] [२९ डिसेंबर, २००७]

**मातापित्यांचा व ज्येष्ठ नागरिकांचा निर्वाह व कल्याण यांसाठी संविधानात हमी दिलेल्या व मान्य केलेल्या अधिक परिणामकारक तरतुदींची व त्याच्याशी संबंधित आणि तदानुषंगिक बाबींची तरतूद करण्यासाठी अधिनियम.**

भारतीय गणराज्याच्या अठ्ठावन्नाव्या वर्षी संसदेद्वारे तो पुढीलप्रमाणे अधिनियमित होवो :—

प्रकरण एक

## प्रारंभिक

**संक्षिप्त नाव, व्याप्ती, प्रयुक्ति व प्रारंभ.** १. (१) या अधिनियमास, मातापिता व ज्येष्ठ नागरिक यांचा निर्वाह व कल्याण अधिनियम, २००७ असे म्हणावे.

(२) तो, जम्मू व काश्मीर राज्य वगळता, संपूर्ण भारतास तसेच भारताबाहेरील भारतीय नागरिकांस लागू आहे.

(३) तो, एखादे राज्य शासन, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे नेमून देईल अशा दिनांकास त्या राज्यात अंमलात येईल.

**व्याख्या.** २. या अधिनियमात, संदर्भानुसार अन्य अर्थ अपेक्षित नसेल तर,—

(क) " मुले " या संज्ञेत, मुलगा, मुलगी, नातू व नात यांचा समावेश होतो, परंतु यात अज्ञान व्यक्तीचा समावेश होत नाही ;

(ख) " निर्वाह " या संज्ञेत अन्न, वस्त्र, निवारा आणि वैद्यकीय परिचर्या व उपचार यांसाठी तरतूद करण्याचा समावेश होतो ;

(ग) " अज्ञान व्यक्ती " याचा अर्थ, भारतीय सज्ञानता अधिनियम, १८७५ याच्या तरतुदीं अन्वये जी सज्ञान वयाची झालेली नाही, असे मानले जाते अशी व्यक्ती, असा आहे ; **१८७५ चा ९.**

(घ) " मातापिता " याचा अर्थ, आई किंवा वडील, असा आहे ; मग ते यथास्थिति, जन्मदाते असोत, दत्तक असोत किंवा सावत्र वडील किंवा सावत्र आई असोत, तसेच ते ज्येष्ठ नागरिक असोत वा नसोत ;

(ङ) " विहित " याचा अर्थ, अधिनियमाअन्वये राज्य शासनाने केलेल्या नियमांद्वारे विहित, असा आहे ;

(च) " मालमत्ता " याचा अर्थ, कोणत्याही प्रकारची मालमत्ता, असा आहे,–मग ती जंगम वा स्थावर असो, वडिलोपार्जित वा स्वअर्जित असो, मूर्त वा अमूर्त स्वरूपातील असो–आणि तीमध्ये अशा मालमत्तेतील हक्क किंवा हितसंबंध यांचा समावेश होतो ;

(छ) " नातेवाईक " याचा अर्थ, अपत्यहीन ज्येष्ठ नागरिकाचा, अज्ञानवयीन नसलेला व ज्याच्याकडे त्या ज्येष्ठ नागरिकाच्या मालमत्तेचा कब्जा आहे किंवा त्या ज्येष्ठ नागरिकाच्या मृत्यूनंतर ज्याच्याकडे त्याच्या मालमत्तेचा वारसा जाणार आहे, असा कोणताही वैध वारस, असा आहे ;

(ज) " ज्येष्ठ नागरिक " याचा अर्थ, भारताची नागरिक असलेली साठ किंवा त्याहून अधिक वयाची कोणतीही व्यक्ती, असा आहे ;

(झ) " राज्य शासन " याचा संघ राज्यक्षेत्राच्या संबंधातील अर्थ, संविधानाच्या अनुच्छेद २३९ अन्वये नियुक्त करण्यात आलेला त्या राज्याचा प्रशासक, असा आहे ;

(ञ) " न्यायाधिकरण " याचा अर्थ, कलम ७ अन्वये घटित करण्यात आलेले निर्वाह न्यायाधिकरण, असा आहे ;

(ट) " कल्याण " याचा अर्थ, ज्येष्ठ नागरिकांसाठी अन्न, आरोग्याची देखभाल, करमणूक केंद्रे व इतर आवश्यक सुखसोयी यांची तरतूद करणे, असा आहे.

**अधिनियमाचा अधिभावी प्रभाव असणे.** **३.** या अधिनियमाव्यतिरिक्त अन्य कोणत्याही अधिनियमितीमध्ये किंवा या अधिनियमाव्यतिरिक्त कोणत्याही अधिनियमितीमुळे, अंमलात असणाऱ्या कोणत्याही संलेखात, या अधिनियमाच्या तरतुदींशी विसंगत असे काहीही असले तरी, या अधिनियमाच्या तरतुदींचा प्रभाव असेल.

## प्रकरण दोन

## मातापिता व ज्येष्ठ नागरिक यांचा निर्वाह

**मातापिता व ज्येष्ठ नागरिक यांचा निर्वाह.** **४.** (१) स्वतःच्या कमाईमधून किंवा आपल्या मालकीच्या मालमत्तेमधून स्वतःचा निर्वाह करण्यास असमर्थ असलेला ज्येष्ठ नागरिक, तसेच माता वा पिता, पुढीलप्रमाणे कलम ५ अन्वये अर्ज करण्यास हक्कदार असतील—

(एक) माता वा पिता किंवा आजी वा आजोबा हे, आपल्या अज्ञानवयीन नसणाऱ्या एका किंवा त्याहून अधिक मुलांविरुद्ध ;

(दोन) अपत्यहीन ज्येष्ठ नागरिक हे, कलम २ च्या खंड (छ) मध्ये निर्दिष्ट केलेल्या अशा नातेवाईकांविरुद्ध,

(२) ज्येष्ठ नागरिकाचा निर्वाह करण्याचे यथास्थिति, मुलांचे किंवा नातेवाईकाचे दायित्त्व हे ज्येष्ठ नागरिकास सामान्य जीवन व्यतीत करता यावे यादृष्टीने त्याच्या गरजा पुऱ्या करणे हे असेल.

(३) यथास्थिति, आपल्या आईचा किंवा वडिलांचा किंवा दोघांचा निर्वाह करण्याचे मुलांचे दायित्त्व हे, अशा माता वा पित्याला सामान्य जीवन व्यतीत करता यावे या दृष्टीने त्याच्या गरजा पुऱ्या करणे हे असेल.

(४) ज्येष्ठ नागरिकाचा नातेवाईक असणारी व उत्पन्नाची पुरेशी साधने असणारी कोणतीही व्यक्ती, जर अशा ज्येष्ठ नागरिकांच्या मालमत्तेचा कब्जा तिच्याकडे असेल किंवा अशा ज्येष्ठ नागरिकांची मालमत्ता तिला वारशाने मिळणार असेल तर, अशा ज्येष्ठ नागरिकांचा निर्वाह करील :

परंतु असे की, एखाद्या ज्येष्ठ नागरिकाची मालमत्ता वारशाने मिळण्यास एकाहून अधिक नातेवाईक हक्कदार असतील त्याबाबतीत, त्या नातेवाईकांना ज्या प्रमाणात ती मालमत्ता वारशाने मिळणार असेल त्या प्रमाणात त्यांच्याकडून निर्वाह खर्च देय असेल.

**निर्वाह खर्चासाठी अर्ज.** **५.** (१) कलम ४ खालील निर्वाह खर्चासाठी करावयाचा अर्ज हा,

(क) ज्येष्ठ नागरिक किंवा, यथास्थिति, माता वा पिता याला करता येईल ; किंवा

(ख) जर तो असमर्थ असेल तर, त्याने प्राधिकृत केली असेल अशी कोणतीही व्यक्ती किंवा संघटना यांना करता येईल ; किंवा

(ग) न्यायाधिकरणाला स्वतःहून त्याची दखल घेता येईल.

**स्पष्टीकरण.**—या कलमाच्या प्रयोजनांसाठी "संघटना" याचा अर्थ, सोसायटी नोंदणी अधिनियम, १८६० किंवा त्या त्या वेळी अंमलात असलेला इतर कोणताही कायदा याअन्वये नोंदणी करण्यात आलेली कोणतीही स्वयंसेवी संस्था, असा आहे. **१८६० चा २१.**

(२) या कलमाखालील मासिक निर्वाह भत्त्यासंबंधीची कार्यवाही प्रलंबित असताना, न्यायाधिकरणास, अशा मुलांनी किंवा नातेवाईकाने अशा ज्येष्ठ नागरिकाला, तसेच, माता वा पित्याला अंतरिम मासिक निर्वाह भत्ता द्यावा आणि न्यायाधिकरण वेळोवेळी निदेश देईल त्याप्रमाणे अशा ज्येष्ठ नागरिकाला तसेच, माता वा पित्याला तो प्रदान करावा, असा त्यांना आदेश देता येईल.

(३) पोटकलम (१) अन्वये निर्वाह खर्चासाठी केलेला अर्ज प्राप्त झाल्यावर मुलांना किंवा नातेवाईकाला अर्जाबाबत नोटीस दिल्यानंतर आणि पक्षकारांना आपली बाजू मांडण्याची वाजवी संधी दिल्यानंतर, निर्वाह खर्चाची रक्कम निर्धारित करण्यासाठी चौकशी करण्यात येईल.

(४) पोटकलम (२) अन्वये मासिक निर्वाह भत्त्यासाठी आणि कार्यवाहीच्या खर्चासाठी केलेला अर्ज दाखल करण्यात आल्यानंतर, त्या अर्जाबाबतची नोटीस अशा व्यक्तीवर बजावल्याच्या दिनांकापासून नव्वद दिवसांच्या आत, तो अर्ज निकालात काढण्यात येईल :

परंतु असे की, न्यायाधिकरणाला, उक्त कालावधी, अपवादात्मक परिस्थितीत कारणे लेखी नमूद करून, एकदाच, जास्तीतजास्त तीस दिवसांच्या कालावधीसाठी वाढविता येईल.

(५) पोटकलम (१) अन्वये निर्वाहासाठी करावयाचा अर्ज, एका किंवा अधिक व्यक्तींच्या विरोधात दाखल करता येईल :

परंतु असे की, अशा मुलांना किंवा नातेवाईकाला, माता वा पित्याचा निर्वाह चालविण्यास जबाबदार असलेल्या अन्य व्यक्तीला निर्वाह खर्चासाठी केलेल्या अर्जात सामील करून घेता येईल.

(६) निर्वाह खर्चाबाबतचा आदेश एकापेक्षा अधिक व्यक्तींच्या नावे काढण्यात आला असेल अशा बाबतीत, त्यांच्यापैकी एका व्यक्तीचा मृत्यू झाल्यामुळे, निर्वाह खर्च देणे चालू ठेवण्याच्या इतरांच्या जबाबदारीवर कोणताही परिणाम होणार नाही.

(७) असा कोणताही निर्वाह भत्ता आणि कार्यवाहीचा खर्च, आदेशाच्या दिनांकापासून किंवा तसा आदेश देण्यात आला असेल तर, निर्वाहासाठीच्या किंवा, यथास्थिति, कार्यवाहीच्या खर्चासाठीच्या अर्जाच्या दिनांकापासून देय असेल.

(८) अशाप्रकारे आदेश देण्यात आलेल्या मुलांनी किंवा नातेवाईकाने, जर पुरेसे कारण नसताना आदेशाचे पालन करण्यात कसूर केली तर, अशा कोणत्याही न्यायाधिकरणाला, अशा प्रत्येक आदेशभंगासाठी देय असलेली रक्कम वसूल करण्याकरिता, दंड वसुलीसाठी तरतूद करण्यात आलेल्या रीतीने अधिपत्र काढता येईल आणि अशा व्यक्तीला, अधिपत्र बजावल्यानंतर द्यावयाचा राहिलेला प्रत्येक महिन्याचा संपूर्ण निर्वाह भत्ता आणि यथास्थिति, कार्यवाहीचा संपूर्ण खर्च याच्या रकमेसाठी किंवा त्याच्या भागासाठी एक महिन्यापर्यंतची असू शकेल इतक्या मुदतीच्या किंवा प्रदान लवकर करण्यात आले असेल तर, प्रदान करेपर्यंतची मुदत यापैकी जे आधी घडेल अशा मुदतीच्या कारावासाची शिक्षा देता येईल :

परंतु असे की, या कलमानुसार देय असलेल्या कोणत्याही रकमेच्या वसुलीसाठी, अशी रक्कम देय झाल्याच्या दिनांकापासून तीन महिन्यांच्या आत अशी रक्कम वसूल करण्याच्या संबंधात न्यायाधिकरणाकडे अर्ज करण्यात आलेला असल्याखेरीज कोणतेही अधिपत्र काढण्यात येणार नाही.

**अधिकारिता आणि कार्यपद्धती.**

**६.** (१) कलम ५ अन्वये कोणत्याही मुलांविरूद्ध किंवा नातेवाईकांविरूद्ध करावयाची कोणतीही कार्यवाही :–

(क) ती व्यक्ती जेथे राहते किंवा शेवटी राहत होती ; किंवा

(ख) जेथे मुले राहतात किंवा नातेवाईक राहतो,

अशा कोणत्याही जिल्ह्यात करता येईल.

(२) कलम ५ अन्वये अर्ज मिळाल्यानंतर, न्यायाधिकरण ज्यांच्या विरोधात अर्ज दाखल करण्यात आला असेल अशा मुलांनी किंवा नातेवाईकांनी उपस्थित रहावे यासाठी आदेशिका काढील.

**१९७४ चा २.** (३) मुले किंवा नातेवाईक यांची उपस्थिती निश्चित करण्यासाठी, न्यायाधिकरणाला फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ अन्वये प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी यांच्यासाठी तरतूद करण्यात आलेला अधिकार असेल.

(४) अशा कार्यवाहीतील सर्व साक्षीपुरावा, जी मुले किंवा नातेवाईक यांच्या विरोधात निर्वाह खर्च प्रदानाचा आदेश काढण्याचे प्रस्तावित केले असेल, त्यांच्या उपस्थितीत घेण्यात येईल आणि समन्स प्रकरणांसाठी विहित केलेल्या रीतीने तो नोंदविण्यात येईल :

परंतु असे की, ज्यांच्याविरुद्ध निर्वाह खर्चाच्या प्रदानाचा आदेश काढण्याचे प्रस्तावित करण्यात आले असेल अशी मुले किंवा नातेवाईक त्याची बजावणी बुद्धिपुरस्सर टाळत असल्याबद्दल, किंवा न्यायाधिकरणासमोर उपस्थित राहण्यात बुद्धिपुरस्सर हयगय करीत असल्याबद्दल न्यायाधिकरणाची खात्री झाली तर, न्यायाधिकरणाला त्या प्रकरणाची एकतर्फी सुनावणी करून ते निकालात काढता येईल.

(५) मुले किंवा नातेवाईक भारताबाहेर राहत असतील अशा बाबतीत, केंद्र सरकार, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे याबाबतीत विनिर्दिष्ट करील अशा प्राधिकाऱ्यामार्फत न्यायाधिकरण समन्स बजावील.

(६) न्यायाधिकरण, कलम ५ खालील अर्जाची सुनावणी करण्यापूर्वी ते समेटकर्त्या अधिकाऱ्याकडे निर्देशित करील आणि असा समेटकर्ता अधिकारी आपले निष्कर्ष एका महिन्यात सादर करील आणि जर सलोख्याचा समझोता झाला तर, न्यायाधिकरण तशा आशयाचा आदेश काढील.

**स्पष्टीकरण.–** या पोटकलमाच्या प्रयोजनांसाठी " समेटकर्ता अधिकारी " याचा अर्थ, कलम ५ च्या पोटकलम (१) च्या स्पष्टीकरणात निर्दिष्ट केलेल्या संघटनेतील कोणतीही व्यक्ती किंवा प्रतिनिधी किंवा कलम १८ च्या पोटकलम (१) अन्वये राज्य शासनाने पदनिर्देशित केलेला निर्वाह अधिकारी, किंवा न्यायाधिकरणाने या प्रयोजनासाठी नामनिर्देशित केलेली इतर कोणतीही व्यक्ती, असा आहे.

**निर्वाह न्यायाधिकरण घटित करणे.**

**७.** (१) राज्य शासन, या अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकापासून सहा महिन्यांच्या आत, कलम ५ खालील निर्वाह आदेश अभिनिर्णीत करण्याच्या आणि त्यावर निर्णय देण्याच्या प्रयोजनासाठी, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, अधिसूचनेत विनिर्दिष्ट करण्यात आले असेल त्याप्रमाणे, प्रत्येक उपविभागासाठी एक किंवा अधिक न्यायाधिकरणे घटित करील.

(२) न्यायाधिकरणाच्या अध्यक्षपदी, राज्याच्या उप विभागीय अधिकाऱ्याच्या दर्जापेक्षा कमी दर्जाची नसेल अशी व्यक्ती असेल.

(३) कोणत्याही क्षेत्रासाठी दोन किंवा अधिक न्यायाधिकरणे घटित करण्यात आली असतील अशा बाबतीत, राज्य शासनाला सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे, त्यांच्यामध्ये कामकाजाचे वाटप करण्याबाबत विनियमन करता येईल.

**चौकशीच्या बाबतीत संक्षिप्त कार्यपद्धती.**

**८.** (१) कलम ५ अन्वये चौकशी करताना, न्यायाधिकरण, राज्य शासनाकडून याबाबतीत विहित करण्यात येतील अशा कोणत्याही नियमांना अधीन राहून, त्याला योग्य वाटेल अशा संक्षिप्त कार्यपद्धतीचा अवलंब करील.

(२) शपथेवर साक्षीपुरावा घेणे व साक्षीदारांना उपस्थित राहण्यास भाग पाडणे आणि दस्तऐवज व महत्वाच्या वस्तू शोधण्याची व सादर करण्याची सक्ती करणे या प्रयोजनांसाठी आणि विहित करण्यात येतील अशा इतर प्रयोजनांसाठी न्यायाधिकरणाला दिवाणी न्यायालयाचे सर्व अधिकार असतील; आणि फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ याचे कलम १९५ आणि प्रकरण सव्वीस यांच्या सर्व प्रयोजनांसाठी न्यायाधिकरण हे दिवाणी न्यायालय असल्याचे मानण्यात येईल. **१९७४ चा २.**

(३) याबाबतीत करण्यात येईल अशा कोणत्याही नियमाला अधीन राहून, न्यायाधिकरणाला, निर्वाहसंबंधीची कोणतीही हक्कमागणी अभिनिर्णीत करण्याच्या आणि निर्णय देण्याच्या प्रयोजनासाठी, चौकशीशी संबंद्ध अशा कोणत्याही बाबीचे विशेष ज्ञान असणाऱ्या एका किंवा अधिक व्यक्तींची, त्याला (न्यायाधिकरणाला) चौकशीत साहाय्य करण्यासाठी निवड करता येईल.

**निर्वाह खर्चासाठी आदेश.**

**९.** (१) स्वतःचा निर्वाह करण्यास असमर्थ असलेल्या ज्येष्ठ नागरिकाचा निर्वाह करण्यात मुले किंवा, यथास्थिति, नातेवाईक हयगय करत असतील किंवा त्यास नकार देत असतील तर, अशी हयगय किंवा नकार याबाबत न्यायाधिकरणाची खात्री झाली तर, अशा ज्येष्ठ नागरिकाच्या निर्वाहासाठी, न्यायाधिकरणास, त्यास योग्य वाटेल अशा मासिक दराने मासिक भत्ता देण्याबाबतचा आणि न्यायाधिकरण वेळोवेळी निदेश देईल त्याप्रमाणे, त्याचे प्रदान करण्याबाबतचा आदेश, अशा मुलांना किंवा नातेवाईकांना देता येईल.

(२) न्यायाधिकरणाला, राज्य शासनाकडून विहित करण्यात येईल इतक्या जास्तीतजास्त निर्वाह भत्त्याबाबतचे आदेश देता येतील. तो भत्ता दरमहा दहा हजार रुपयांपेक्षा अधिक असणार नाही.

**भत्त्यात फेरफार.**

**१०.** (१) कलम ९ अन्वये मासिक भत्ता मिळत असलेल्या कोणत्याही व्यक्तीच्या बाबतीत, त्या कलमान्वये निर्वाहासाठी मासिक भत्त्याच्या प्रदानाकरिता निर्वाह आदेश मिळविण्यासाठी तिने दिशाभूल केल्याचा, तथ्यविषयक भूलचूक केल्याचा किंवा तिच्या परिस्थितीत बदल झाल्याचा पुरावा मिळाल्यावरून, न्यायाधिकरणाला, निर्वाह भत्त्यामध्ये त्याला योग्य वाटतील असे फेरफार करता येतील.

(२) जेथे सक्षम दिवाणी न्यायालयाच्या कोणत्याही निर्णयाच्या परिणामी, कलम ९ अन्वये काढलेला कोणताही आदेश रद्द करण्यात आला पाहिजे किंवा त्यात बदल करण्यात आला पाहिजे, असे न्यायाधिकरणाला वाटेल त्याबाबतीत, ते, यथास्थिति, असा आदेश रद्द करील किंवा त्यात बदल करील.

**११.** (१) निर्वाह खर्चासंबंधीच्या आदेशाची, तसेच यथास्थिति, कार्यवाहीच्या खर्चासंबंधातील आदेशाची प्रत, ज्यांच्या नावे तो आदेश देण्यात आला असेल अशा यथास्थिति, ज्येष्ठ नागरिकाला किंवा माता वा पित्याला, कोणतीही फी न घेता देण्यात येईल आणि ज्या व्यक्तीच्या विरुद्ध तो आदेश देण्यात आला असेल, ती व्यक्ती जेथे असेल अशा कोणत्याही ठिकाणी कोणत्याही न्यायाधिकरणाकडून अशा आदेशाची अंमलबजावणी केली जाईल. मात्र, पक्षकारांच्या ओळखीबाबत आणि देय भत्ता किंवा, यथास्थिति, खर्चाची रक्कम त्यांना चुकती करण्यात न आल्याबाबत अशा न्यायाधिकरणाची खात्री पटलेली असली पाहिजे. **निर्वाह खर्चासंबंधीच्या आदेशाची अंमलबजावणी.**

(२) या अधिनियमान्वये देण्यात आलेल्या निर्वाह खर्चासंबंधीच्या आदेशाचा प्रभाव व परिणाम, **१९७४ चा २.** फौजदारी प्रकिया संहिता, १९७३ याच्या प्रकरण नऊ अन्वये देण्यात आलेल्या आदेशाप्रमाणेच असेल आणि त्या आदेशाच्या अंमलबजावणीसाठी त्या संहितेद्वारे विहित केलेल्या रीतीनेच या आदेशाचीही अंमलबजावणी होईल.

**१९७४ चा २.** **१२.** फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ याच्या प्रकरण नऊ मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, जेथे एखादा ज्येष्ठ नागरिक किंवा माता वा पिता उक्त प्रकरणान्वये निर्वाह खर्च मिळण्यास हक्कदार असेल आणि या अधिनियमा-अन्वये देखील निर्वाह खर्च मिळण्यास हक्कदार असेल तेव्हा, त्याला उक्त संहितेच्या प्रकरण नऊच्या तरतुदींना बाध न येता, त्या दोहोंपैकी एका अन्वये निर्वाह खर्चाची हक्कमागणी करता येईल, दोन्हीअन्वये नाही. **विवक्षित प्रकरणांमध्ये निर्वाह खर्चासंबंधीचा विकल्प.**

**१३.** जेव्हा या प्रकरणान्वये आदेश देण्यात आला असेल तेव्हा, अशा आदेशानुसार ज्यांनी अशी कोणतीही रक्कम देणे अपेक्षित असेल ती मुले किंवा तो नातेवाईक न्यायाधिकरणाकडून अशा आदेशाची घोषणा झाल्याच्या दिनांकापासून तीस दिवसांच्या आत, आदेशात नमूद केलेली संपूर्ण रक्कम, न्यायाधिकरण निदेश देईल अशा रीतीने जमा करील. **निर्वाह खर्चाची रक्कम जमा करणे.**

**१४.** एखादे न्यायाधिकरण या अधिनियमान्वये निर्वाह खर्च देण्यासंबंधीचा आदेश देईल त्याबाबतीत, अशा न्यायाधिकरणाला, निर्वाह खर्चाच्या रकमेसोबत, न्यायाधिकरण ठरवील अशा दराने आणि अर्ज करण्यात आल्याच्या दिनांकाच्या अगोदरची नसेल अशा दिनांकापासून, सरळ व्याज देण्याचाही निदेश देता येईल, मात्र, त्या व्याजाचा दर पाच टक्क्यांहून कमी नसेल व अठरा टक्क्यांहून अधिक नसेल : **कोणतीही हक्कमागणी मंजूर करण्यात येईल त्याबाबतीत व्याज देण्याचाही आदेश देणे.**

**१९७४ चा २.** परंतु असे की, या अधिनियमाच्या प्रारंभाच्या वेळी, फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ याच्या प्रकरण नऊ अन्वये निर्वाहासाठी केलेला कोणताही अर्ज एखाद्या न्यायालयासमोर प्रलंबित असेल त्याबाबतीत, ते न्यायालय माता वा पित्याच्या विनंतीवरून, तो अर्ज मागे घेण्यास परवानगी देईल आणि माता वा पिता, न्यायाधिकरणासमोर निर्वाहासाठी अर्ज दाखल करण्यास हक्कदार असेल.

**१५.** (१) राज्य शासनास, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, न्यायाधिकरणाच्या आदेशावरील अपिलाची सुनावणी करण्यासाठी प्रत्येक जिल्ह्याकरिता, एक अपील न्यायाधिकरण घटित करता येईल. **अपील न्यायाधिकरण घटित करणे.**

(२) अपील न्यायाधिकरणाच्या अध्यक्षपदी जिल्हा दंडाधिकाऱ्यापेक्षा कमी दर्जा नसलेला अधिकारी असेल.

**१६.** (१) न्यायाधिकरणाच्या आदेशामुळे व्यथित झालेल्या कोणत्याही ज्येष्ठ नागरिकाला किंवा, यथास्थिति, माता वा पित्याला, आदेशाच्या दिनांकापासून साठ दिवसांच्या आत, अपील न्यायाधिकरणाकडे अपील दाखल करता येईल : **अपिले.**

परंतु असे की, अपील करण्यात आल्यानंतर, अशा निर्वाह आदेशानुसार ज्यांनी कोणतीही रक्कम भरणे आवश्यक असेल, ती मुले किंवा तो नातेवाईक आदेशातील ती रक्कम अपील न्यायाधिकरणाकडून निदेशित करण्यात आलेल्या रीतीने त्या माता वा पित्यांना देणे चालू ठेवील :

परंतु, आणखी असे की, अपील न्यायाधिकरणाची जर अशी खात्री झाली की, अपीलकर्त्याला ते अपील वेळेच्या आत दाखल करण्यास प्रतिबंध होण्यास पुरेसे कारण होते तर, अपील न्यायाधिकरणास ते अपील, साठ दिवसांची उक्त मुदत संपल्यानंतरही दाखल करून घेता येईल.

(२) अपील मिळाल्यानंतर अपील न्यायाधिकरण उत्तरवादीवर नोटीस बजावण्याची व्यवस्था करील.

(३) ज्या न्यायाधिकरणाच्या आदेशाविरुद्ध अपील करण्यात आले असेल त्या न्यायाधिकरणाकडून, अपील न्यायाधिकरणाला कार्यवाहीच्या अभिलेखाची मागणी करता येईल.

(४) अपील न्यायाधिकरणास, अपिलाची व मागवलेल्या अभिलेखाची तपासणी केल्यानंतर, ते अपील स्वीकारता येईल किंवा फेटाळता येईल.

(५) न्यायाधिकरणाच्या आदेशाविरुद्ध दाखल केलेल्या अपिलावर, अपील न्यायाधिकरण अभिनिर्णीत करून निर्णय देईल आणि अपील न्यायाधिकरणाचा आदेश अंतिम असेल :

परंतु असे की, दोन्ही पक्षांना आपले म्हणणे स्वतः किंवा रीतसर प्राधिकृत प्रतिनिधीमार्फत मांडण्याची संधी दिल्याशिवाय, कोणतेही अपील फेटाळण्यात येणार नाही.

(६) अपील न्यायाधिकरण, अपील मिळाल्याच्या दिनांकापासून एक महिन्याच्या आत आपला आदेश लेखी अधिघोषित करण्याचा प्रयत्न करील.

(७) पोटकलम (५) अन्वये दिलेल्या प्रत्येक आदेशाची प्रत दोन्ही पक्षांना विनामूल्य पाठवण्यात येईल.

**कायदेशीर प्रतिनिधित्वाचा हक्क.**

**१७.** कोणत्याही कायद्यात काहीही अंतर्भूत असले तरी, न्यायाधिकरणासमोरील किंवा अपील न्यायाधिकरणासमोरील कार्यवाहीमधील कोणत्याही पक्षाचे प्रतिनिधित्व विधि व्यवसायीमार्फत केले जाणार नाही.

**निर्वाह अधिकारी.**

**१८.** (१) राज्य शासन, जिल्हा समाज कल्याण अधिकाऱ्यास किंवा जिल्हा समाज कल्याण अधिकाऱ्यापेक्षा कमी दर्जाचा नसलेल्या एखाद्या अधिकाऱ्यास निर्वाह अधिकारी म्हणून पदनिर्देशित करील, मग त्याला कोणत्याही नावाने संबोधण्यात येवो.

(२) पोटकलम (१) मध्ये उल्लेखलेला निर्वाह अधिकारी, माता वा पित्याची तशी इच्छा असल्यास, न्यायाधिकरणाच्या किंवा, यथास्थिति, अपील न्यायाधिकरणाच्या कार्यवाहीत, त्यांचे प्रतिनिधित्व करील.

## प्रकरण तीन

## वृद्धाश्रमांची स्थापना

**वृद्धाश्रमांची स्थापना.**

**१९.** (१) राज्य शासनास, प्रारंभी प्रत्येक जिल्ह्यासाठी एक अशा रीतीने, सहजगम्य अशा ठिकाणी, टप्प्याटप्प्याने, आवश्यकता वाटेल तेवढ्या संख्येने, जेथे किमान दीडशे निर्धन ज्येष्ठ नागरिकांची सोय होऊ शकेल असे वृद्धाश्रम स्थापना करता येतील व चालवता येतील.

(२) राज्य शासनास, या वृद्धाश्रमांच्या व्यवस्थापनासाठी योजना विहित करता येईल, तसेच अशा वृद्धाश्रमातील रहिवाशांसाठी तेथे वैद्यकीय सेवा व करमणुकीची साधने याकरिता आवश्यक अशा ज्या विविध सेवा उपलब्ध करून देण्यात येतील त्यांची मानके व प्रकार या बाबीही विहित करता येतील.

**स्पष्टीकरण.—** या कलमाच्या प्रयोजनार्थ, " निर्धन " याचा अर्थ, राज्य शासनाने वेळोवेळी ठरवून दिल्यानुसार ज्याच्याकडे उदरनिर्वाहाची पुरेशी साधने नाहीत असा कोणताही ज्येष्ठ नागरिक, असा आहे.

## प्रकरण चार

## ज्येष्ठ नागरिकांसाठी वैद्यकीय सेवेची तरतूद

**ज्येष्ठ नागरिकांना वैद्यकीय साहाय्य.**

**२०.** राज्य शासन पुढील बाबींविषयी खातरजमा करून घेईल :—

(एक) शासकीय रुग्णालयांमध्ये किंवा संपूर्णतः वा अंशतः शासनाकडून निधी पुरवल्या जाणाऱ्या रुग्णालयांमध्ये शक्यतोवर सर्व ज्येष्ठ नागरिकांसाठी खाटांची तरतूद केली जाईल.

(दोन) ज्येष्ठ नागरिकांसाठी स्वतंत्र रांगांची व्यवस्था केली जाईल.

(तीन) दीर्घकालिक, जीवघेण्या व ऱ्हासकारी रोगांसाठी असलेल्या उपचारांच्या सुविधा ज्येष्ठ नागरिकांनादेखील उपलब्ध करून दिल्या जातील.

(चार) दीर्घकालिक वार्धक्याचे आजार व वृद्धावस्था या विषयीच्या संशोधन कार्यात वाढ केली जाईल.

(पाच) प्रत्येक जिल्हा रुग्णालयामध्ये जराजर्जर रुग्णांकरिता खास सुविधा राखून ठेवून त्यांचे प्रमुखपद, अशा रुग्णांच्या उपचार पद्धतीचा अनुभव असणाऱ्या वैद्यकीय अधिकाऱ्याकडे सोपवण्यात येईल.

## प्रकरण पाच

## ज्येष्ठ नागरिकांचे जीवित व मालमत्ता यांचे संरक्षण

**ज्येष्ठ नागरिकांच्या कल्याणासाठी प्रसिद्धी, जाणीव, इत्यादींसंबंधीच्या उपाययोजना.**

**२१.** (एक) या अधिनियमाच्या तरतुदींना, दूरचित्रवाणी, आकाशवाणी आणि वृत्तपत्रे यांसह जनप्रचार माध्यमांद्वारे नियमित कालांतराने व्यापक प्रसिद्धी देण्यात येत आहे;

(दोन) केंद्र सरकारचे व राज्य शासनाचे अधिकारी, तसेच पोलीस अधिकारी आणि न्यायिक सेवेतील व्यक्ती यांना, या अधिनियमाशी संबंधित प्रश्नांच्या बाबतीत संवेदनशीलता आणि जाणीव निर्माण करण्याच्या दृष्टीने नियतकालिक प्रशिक्षण देण्यात येत आहे;

(तीन) ज्येष्ठ नागरिकांच्या कल्याणाशी संबंधित प्रश्नांवर उपाययोजना करण्यासाठी, कायदा, गृह, आरोग्य आणि कल्याण यांचे काम पाहणारी संबंधित मंत्रालये व विभाग यांच्याकडून पुरविल्या जाणाऱ्या सेवांमध्ये प्रभावीपणे समन्वय साधला जात आहे आणि त्याचा नियतकालिक आढावा घेण्यात येत आहे;

हे सुनिश्चित करण्यासाठी राज्य शासन सर्व उपाययोजना करील.

**या अधिनियमाच्या तरतुदींची अंमलबजावणी करण्यासाठी विनिर्दिष्ट करता येतील असे प्राधिकारी.**

**२२.** (१) राज्य शासनास, या अधिनियमाच्या तरतुदींची योग्य रीतीने अंमलबजावणी करण्यात येत आहे, हे सुनिश्चित करण्यासाठी, जिल्हा दंडाधिकाऱ्याला, आवश्यक असतील असे अधिकार प्रदान करता येतील आणि अशी कर्तव्ये सोपविता येतील आणि जिल्हा दंडाधिकाऱ्यास, त्यात दुय्यम असलेला असा अधिकारी विनिर्दिष्ट करता येईल जो अशा प्रकारे प्रदान करण्यात आलेल्या सर्व किंवा कोणत्याही अधिकारांचा वापर करील आणि सोपविण्यात आलेली सर्व किंवा कोणतीही कर्तव्ये पार पाडील आणि त्या अधिकाऱ्याकडून, ज्या स्थानिक सीमांच्या आत अशा अधिकारांची किंवा कर्तव्यांची अंमलबजावणी करण्यात येईल त्या स्थानिक सीमा विहित करण्यात येतील अशा असतील.

(२) राज्य शासन, ज्येष्ठ नागरिकांचे जीवन व मालमत्ता यांच्या संरक्षणाची तरतूद करण्यासाठी एक व्यापक कृतियोजना विहित करील.

**मालमत्तेचे हस्तांतरण विवक्षित परिस्थितीत शून्यवत ठरणे.**

**२३.** (१) कोणत्याही ज्येष्ठ नागरिकाने, या अधिनियमाच्या प्रारंभानंतर, त्याच्या मालमत्तेचे, हस्तांतरिती मूलभूत सुखसोयी आणि भौतिक गरजा, हस्तांतरकाला पुरवील या अटीस अधीन राहून, दानाच्या स्वरूपात किंवा अन्य प्रकारे हस्तांतरण केलेले असेल आणि असा हस्तांतरिती, अशा सुखसोयी व भौतिक गरजा पुरविण्यास नकार देईल किंवा कसूर करील त्याबाबतीत, मालमत्तेचे उक्त हस्तांतरण हे कपटाने किंवा जबरदस्तीने, किंवा गैरवाजवी दडपणाखाली करण्यात आले असल्याचे मानण्यात येईल आणि ते हस्तांतरकाच्या विकल्पानुसार न्यायाधिकरणाकडून शून्यवत म्हणून घोषित करण्यात येईल.

(२) कोणत्याही ज्येष्ठ नागरिकास संपदेमधून निर्वाह खर्च मिळण्याचा हक्क असेल आणि अशी संपदा किंवा तिचा भाग हस्तांतरित करण्यात आलेला असेल त्याबाबतीत हस्तांतरितीला जर त्या हक्काची माहिती मिळालेली असेल तर, किंवा ते हस्तांतरण विनामोबदला असेल तर, त्या हस्तांतरितीच्या विरुद्ध निर्वाह खर्च मिळण्याचा हक्क बजावला जाऊ शकेल परंतु, मोबदला देऊन झालेल्या व त्या हक्काची माहिती नसलेल्या हस्तांतरितीच्या विरुद्ध तो बजावला जाऊ शकणार नाही.

(३) कोणताही ज्येष्ठ नागरिक जर पोटकलम (१) व (२) यांअन्वये हक्क बजावण्यास असमर्थ असेल तर, कलम ५ च्या पोटकलम (१) च्या स्पष्टीकरणात निर्देश केलेल्यांपैकी कोणत्याही संघटनेस त्याच्या वतीने कारवाई करता येईल.

## प्रकरण सहा

## अपराध आणि न्यायचौकशीची कार्यपद्धती

**ज्येष्ठ नागरिकास उघड्यावर टाकणे व त्याचा परित्याग करणे.**

**२४.** ज्येष्ठ नागरिकाचा सांभाळ किंवा संरक्षण करण्याची जबाबदारी असणारा जो कोणी, अशा ज्येष्ठ नागरिकाचा पूर्णपणे परित्याग करण्याच्या हेतूने कोणत्याही ठिकाणी त्यास सोडून जाईल तो, तीन महिन्यांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाची किंवा पाच हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची, या दोहांपैकी कोणत्याही स्वरूपाची शिक्षा किंवा या दोन्ही शिक्षा केल्या जाण्यास पात्र ठरेल.

**अपराधांची दखल.**

१९७४ चा २. **२५.** (१) फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ यात काहीही अंतर्भूत असले तरी, या अधिनियमाअन्वये प्रत्येक अपराध हा दखलपात्र आणि जामीनयोग्य असेल.

(२) या अधिनियमाखालील अपराधाची दंडाधिकाऱ्याकडून संक्षिप्तपणे न्याय चौकशी करण्यात येईल.

## प्रकरण सात

## संकीर्ण

**अधिकारी लोकसेवक असणे.**

१८६० चा ४५. **२६.** या अधिनियमाअन्वये कामे पार पाडण्यासाठी नियुक्त करण्यात आलेला प्रत्येक अधिकारी किंवा कर्मचारीवर्ग हा, भारतीय दंड संहितेच्या कलम २१ च्या अर्थांतर्गत लोकसेवक असल्याचे मानण्यात येईल.

**दिवाणी न्यायालयांच्या अधिकारितेस रोध.**

**२७.** कोणत्याही दिवाणी न्यायालयास, या अधिनियमाची कोणतीही तरतूद ज्या बाबीला लागू होते, अशा कोणत्याही बाबीच्या संबंधात अधिकारिता असणार नाही आणि या अधिनियमाद्वारे किंवा तद्नुसार करण्यात आलेल्या किंवा करण्याचा हेतू असलेल्या कोणत्याही गोष्टीच्या संबंधात, कोणत्याही दिवाणी न्यायालयाकडून मनाई हुकूम दिला जाणार नाही.

**सद्भावपूर्वक केलेल्या कृतीस संरक्षण.**

**२८.** हा अधिनियम आणि त्या अन्वये करण्यात आलेले कोणतेही नियम किंवा आदेश यानुसार सद्भावपूर्वक करण्यात आलेल्या किंवा करण्यात आल्याचे अभिप्रेत असलेल्या कोणत्याही गोष्टीच्या संबंधात, केंद्र सरकार, राज्य शासने किंवा स्थानिक प्राधिकरण किंवा शासनाचा कोणताही अधिकारी यांच्याविरुद्ध कोणताही दावा, खटला किंवा इतर कायदेशीर कार्यवाही दाखल करता येणार नाही.

**अडचणी दूर करण्याचा अधिकार.**

**२९.** या अधिनियमाच्या तरतुदी अंमलात आणताना कोणतीही अडचण उद्भवली तर, राज्य शासनास, **राजपत्रात** आदेश प्रसिद्ध करून त्याद्वारे, अडचण दूर करण्यासाठी त्यास आवश्यक किंवा इष्ट वाटतील अशा, या अधिनियमाच्या तरतुदींशी विसंगत नसणाऱ्या तरतुदी करता येतील :

परंतु असे की, या अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकापासून दोन वर्षांचा कालावधी संपल्यानंतर असा कोणताही आदेश काढण्यात येणार नाही.

**निदेश देण्याचा केंद्र सरकारचा अधिकार.**

**३०.** केंद्र सरकारला, या अधिनियमाच्या तरतुदींची अंमलबजावणी करण्याच्या संबंधात राज्य शासनांना निदेश देता येतील.

**आढावा घेण्याचा केंद्र सरकारचा अधिकार.**

**३१.** केंद्र सरकारला, या अधिनियमाच्या तरतुदींच्या राज्य शासनांकडून केल्या जाणाऱ्या अंमलबजावणीच्या प्रगतीचा नियतकालिक आढावा घेता येईल व तिचे संनियंत्रण करता येईल.

**नियम करण्याचा राज्य शासनाचा अधिकार.**

**३२.** (१) राज्य शासनास, या अधिनियमाची प्रयोजने पार पाडण्याकरिता **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे नियम करता येतील.

(२) पूर्वगामी अधिकारांच्या सर्वसाधारणतेस बाध न येऊ देता अशा नियमांमध्ये पुढील बाबींसाठी तरतूद करता येईल-

(क) कलम ८ च्या पोटकलम (१) अन्वये विहित करण्यात येतील अशा नियमांना अधीन राहून कलम ५ अन्वये चौकशी करण्याची रीत;

(ख) कलम ८ च्या पोटकलम (२) अन्वये इतर प्रयोजनांसाठी असलेला न्यायाधिकरणाचा अधिकार व कार्यपद्धती;

(ग) न्यायाधिकरण कलम ९ च्या पोटकलम (२) अन्वये आदेश देऊ शकेल असा जास्तीत जास्त निर्वाह भत्ता;

(घ) वृद्धाश्रमांचे व्यवस्थापन तसेच कलम १९ च्या पोटकलम (२) अन्वये अशा वृद्धाश्रमातील रहिवाशांसाठी वैद्यकीय सेवा व त्यांच्या करमणुकीची साधने यांकरिता आवश्यक असतील अशा, त्यांच्याकडून पुरविण्यात यावयाच्या विविध प्रकारच्या सेवा व त्यांची मानके, यांसाठी योजना;

(ङ) या अधिनियमाच्या तरतुदींची अंमलबजावणी करण्यासाठी प्राधिकाऱ्यांना कलम २२ च्या पोटकलम (१) अन्वये असणारे अधिकार व कर्तव्ये;

(च) ज्येष्ठ नागरिकाचे जीवन व मालमत्ता यांच्या संरक्षणाची तरतूद करण्यासाठी कलम २२ च्या पोटकलम (२) अन्वये करावयाची एक व्यापक कृतियोजना;

(छ) विहित करावयाची किंवा करण्यात येईल अशी कोणतीही अन्य बाब.

(३) या अधिनियमाअन्वये करण्यात आलेला प्रत्येक नियम, तो करण्यात आल्यानंतर शक्य तितक्या लवकर, जेथे राज्य विधानमंडळ दोन सभागृहांचे मिळून बनलेले असेल तेथे त्याच्या प्रत्येक सभागृहापुढे आणि जेथे असे विधानमंडळ हे एका सभागृहाचे मिळून बनलेले असेल तेथे त्या सभागृहापुढे ठेवण्यात येईल.

**मातापिता व ज्येष्ठ नागरिक यांचा निर्वाह व कल्याण अधिनियम, २००७**

**The Maintenance and Welfare of Parents and Senior Citizens Act, 2007**

मराठी-इंग्रजी शब्दसूची

| | | |
|---|---|---|
| अधिघोषित करणे | Pronounce | [क. १६ (६)] |
| अधिभावी प्रभाव | Overriding effect | [क. ३ (स.टी.)] |
| अपत्यहीन | Childless | [क. २ (छ)] |
| अपवादात्मक परिस्थिती | Exceptional circumstances | [क. ५ (४) परंतुक] |
| अभिनिर्णय करणे | Adjudicate | [क. १६ (५)] |
| अज्ञान व्यक्ती | Minor | [क. २ (ग)] |
| आई किंवा वडील | Father or Mother | [क. २ (घ)] |
| आदेशिका | Process | [क. ६ (२)] |
| आवश्यक सुखसोयी | Necessary amenities | [क. २ (ट)] |
| उघड्यावर टाकणे | Exposure | [क. २४ (स.टी.)] |
| उत्तरवादी | Respondent | [क. १६ (२)] |
| उप विभागीय अधिकारी | Sub-divisional Officer | [क. ७ (२)] |
| एकतर्फी | *ex-parte* | [क. ६(४) (परंतुक)] |
| करमणूक केंद्र | Recreation centre | [क. २ (ट)] |
| गैरवाजवी दडपण | Undue influence | [क. २३ (१)] |
| जबरदस्ती | Coercion | [क. २३ (१)] |
| जराजर्जर रुग्ण | Geriatric patient | [क. २० (पाच)] |
| जीवन व्यतीत करणे | To lead life | [क. ४ (२)] |
| ज्येष्ठ नागरिक | Senior citizen | [क. ४ (१) (दोन)] |
| दीर्घकालिक वार्धक्याचे आजार | Chronic elderly disease | [क. २० (चार)] |
| निर्णय | Decide | [क. १६ (५)] |
| निर्धन | Indigent | [क. १९ (१)] |
| नियतकालिक आढावा | Periodical review | [क. २१ (तीन)] |
| निर्वाह | Maintenance | [क. २ (ख)] |
| निर्वाह अधिकारी | Maintenance Officer | [क. ६ (६) स्पष्टी.] |
| निर्वाह खर्च | Maintenance | [क. ५(१)] |
| निर्वाह न्यायाधिकरण | Maintenance tribunal | [क. २ (ञ)] |
| परित्याग | Abandonment | [क. २४ (स.टी.)] |
| प्रशासक | Administrator | [क. २ (झ)] |
| बुध्दिपुरस्सर | Willfully | [क. ६ (४) (परंतुक)] |
| मातापिता | Parents | शीर्ष |
| माता वा पिता | Parent | |
| मुले | Children | [क. २ (क)] |
| रहिवासी | Inhabitant | [क. १९ (२)] |
| रोध | Bar | [क. २७ (स. टी.)] |
| ऱ्हासकारी रोग | Degenerative disease | [क. २० (तीन)] |
| वडिलोपार्जित मालमत्ता | Ancestral property | [क. २ (च)] |
| विनामूल्य | Free of cost | [क. १६ (७)] |
| वैध वारस | Legal heir | [क. २ (छ)] |
| वैद्यकीय साहाय्य | Medical suport | [क. २० (स. टी.)] |

| | | |
|---|---|---|
| वैद्यकीय सेवा | Madical care | [क. १९ (२)] |
| वृद्धाश्रम | Oldage home | [प्रकरण तीन शीर्षक] |
| शून्यवत | Void | [क. २३ (स. टी.)] |
| समेटकर्ता अधिकारी | Conciliation Officer | [क. ६ (६)] |
| सलोख्याचा समझोता | Amicable settlement | [क. ६ (६)] |
| सहजगम्य ठिकाण | Accessible place | [क. १९ (१)] |
| संक्षिप्त कार्यपद्धती | Summary procedure | [क. ८ (स. टी.)] |
| स्वअर्जित मालमत्ता | Self acquired property | [क. २ (च)] |
| हस्तांतरक | Transferor | [क. २३ (१)] |
| हस्तांतरिती | Transferee | [कलम २३ (१)] |

The Maintenace and welfare of parents and senior citizens Act, 2007

मातापिता व ज्येष्ठ नागरिक यांचा निर्वाह व कल्याण अधिनियम, २००७

इंग्रजी-मराठी शब्दसूची

| | | |
|---|---|---|
| Abandonment | परित्याग | [S. 24 (m.n.)] |
| Accessible place | सहजगम्य ठिकाण | [S. 19 (1)] |
| Adjudicate | अभिनिर्णय | [S. 16 (5)] |
| Administrator | प्रशासक | [S. 2 (i)] |
| Amicable settlement | सलोख्याचा समझोता | [S. 6 (6)] |
| Ancestral property | वडिलोपर्जित मालमत्ता | [S. 2 (f)] |
| Bar | रोध | [S. 27 (m.n.)] |
| Childless | अपत्यहीन | [S. 2 (g)] |
| Children | मुले | [S. 2 (a)] |
| Conciliation Officer | समेटकर्ता अधिकारी | [S. 6 (6)] |
| Coercion | जबरदस्ती | [S. 23 (1)] |
| Chronic elderly disease | दीर्घकालिक वार्धक्याचे आजार | [S. 20 (iv)] |
| Decide | निर्णय | [S. 16 (5)] |
| Degenerative disease | ऱ्हासकारी रोग | [S. 20 (iii)] |
| Exceptional circumstance | अपवादात्मक परिस्थिती | [S. 5 (4) proviso] |
| *ex-parte* | एकतर्फी | [S. 6 (4) (proviso)] |
| Exposure | उघड्यावर टाकणे | [S. 24 (m.n.)] |
| Father or Mother | आई किंवा वडील | [S. 2 (d)] |
| Free of cost | विनामूल्य | [S. 16 (7)] |
| Geriatric patient | जराजर्जर रुग्ण | [S. 20 (v)] |
| Indigent | निर्धन | [S. 19 (1)] |
| Inhabitant | रहिवासी | [S. 19 (2)] |
| Legal heir | वैध वारस | [S. 2 (g)] |
| Maintenance | निर्वाह | [S. 2 (b)] |
| Maintenance | निर्वाह खर्च | [S. 5 (1)] |
| Maintenance Officer | निर्वाह अधिकारी | [S. 6 (6) Expl.] |
| Maintenance Tribunal | निर्वाह न्यायाधिकरण | [S. 2 (j)] |
| Medical care | वैद्यकीय सेवा | [S. 19 (2)] |
| Medical support | वैद्यकीय साहाय्य | [S. 20 (m.n.)] |
| Minor | अज्ञान व्यक्ती | [S. 2 (c)] |
| Necessary amenities | आवश्यक सुखसोयी | [S. 2 (k)] |
| Oldage home | वृद्धाश्रम | [Chap. III Heading] |
| Overriding effect | अधिभावी प्रभाव | [S. 3 (m.n.)] |
| Parent | माता वा पिता | [S. 4 (1)(i)] |
| Parents | मातापिता | [Heading] |
| Periodical review | नियतकालिक आढावा | [S. 21 (iii)] |
| Process | आदेशिका | [S. 6 (2)] |

| | | |
|---|---|---|
| Pronounce | अधिघोषित करणे | [S. 16 (6)] |
| Recreation centre | करमणूक केंद्र | [S. 2 (k)] |
| Respondent | उत्तरवादी | [S. 16 (2)] |
| Self acquired property | स्वअर्जित मालमत्ता | [S. 2 (f)] |
| Senior citizen | ज्येष्ठ नागरिक | [S. 4 (1)(ii)] |
| Sub-Divisional Officer | उप विभागीय अधिकारी | [S. 7 (2)] |
| Summary procedure | संक्षिप्त कार्यपद्धती | [S. 8 (m.n.)] |
| Transferee | हस्तांतरिती | [S. 23 (1)] |
| Transferor | हस्तांतरक | [S. 23 (1)] |
| To lead life | जीवन व्यतीत करणे | [S. 4 (2)] |
| Undue influence | गैरवाजवी दडपण | [S. 23 (1)] |
| Void | शून्यवत | [S. 23 (m.n.)] |
| Willfully | बुद्धिपुरस्सर | [S. 6 (4) (proviso)] |